# ‘कोरोना’वर मात करण्यासाठी शहरातील डॉक्टर सरसावले प्रशासनाच्या मदतीला!

## ‘कोरोना’आटोक्यात आणण्यासाठी कृती आराखडा

**मनमाड ,दि.१८ (प्रतिनिधी) :** शहरात मोठ्या संख्येने कोरोनाबाधित रुग्ण आढळून येत आहेत. शहरातील रुग्णसंखेने साडेतीनशेचा आकडा पार केला असून, मृत्यू होण्याचे प्रमाणदेखील वाढत आहे. अशा परिस्थितीत मनमाडमधील खासगी वैद्यकीय व्यावसायिकांनी पुढे येऊन प्रशासनाला मदत करण्यासाठी एक कृती आराखडा तयार केला आहे. शहराचे मुख्याधिकारी म्हणून नुकतीच सूत्र हाती घेतलेल्या डॉ. विजय मुंडे यांनी शहरातील कोरोनाचे प्रमाण कमी करण्यासाठी येथील नावाजलेल्या अनुभवी वैद्यकीय क्षेत्रातील तज्ज्ञांशी चर्चा केली. या तज्ज्ञांकडून विविध सूचना व व मार्गदर्शन त्यांनी मिळविले या सर्वांना एक कृती आराखडा तयार करून देण्याची विनंती केली. त्यानुसार शहरातील नामवंत डॉक्टरांनी एकत्रित येऊन एक कृती आराखडा तयार केला असून, कोरोना



संक्रमण आटोक्यात आणता येईल, संक्रमित रुग्णांची हेळसांड न होता, त्यांच्यावर लवकरात लवकर व चांगले उपचार केले जातील यासाठी आवश्यक असणारी स्वस्त दरातील औषधे व इतर माहिती देखील शहरातील वैद्यकीय व्यावसायिकांनी प्रशासनाला दिल्याचे बोलले जाते. उपचार पद्धतीत सुधारणा झाल्यास मृत्यूचे प्रमाणदेखील घटेल, असा विश्वासदेखील या वैद्यकीय व्यावसायिकांनी बोलून दाखवला. वेळ पडल्यास शहरातील वैद्यकीय व्यावसायिक प्रशासनाच्या मदतीसाठी तत्पर व तयार असल्याचे आश्वासनदेखील मुख्याधिकाऱ्यांना दिले असल्याचे बोलले जाते. या बैठकीत डॉ. संदीप कुलकर्णी डॉ. प्रताप गुजराथी डॉ. नूतन पहाडे, डॉ.प्रवीण शिंगी, डॉ. सुनील बागरेचा, डॉ. अजय भंसाळी, डॉ. संतोष गुप्ता, डॉ. बिडगर, डॉ. रवींद्र राजपूत, डॉ. पूनम राजपूत, डॉ. वसुधा डोंगरगावकर, डॉ. विनीता कुलकर्णी, डॉ. हाके आदी डॉक्टरांचा समावेश आहे. वैद्यकीय व्यावसायिकांनी केलेल्या कृती आराखड्याला प्रशासन कितपत साथ देते, सहकार्य करते, यावरच शहराचे भवितव्य अवलंबून आहे. शहरातील डॉक्टर्सनी उचललेल्या या पावलाचे सर्वत्र स्वागत होत आहे

### ‘कोरोना’चा मनमाडच्या वित्तीय संस्थांवरदेखील घाला

मनमाड शहरात कोरोना विषाणूचा प्रकोप दिवसागणिक वाढत असून रोज कोरोना संक्रमित रुग्ण आढळून येत आहेत. मृत्यूदेखील होत आहे. कोरोना विषाणूने शहराच्या अर्थकारणावर घाला घातला आहे. शहराच्या अर्थकारणाचे केंद्र समजली जाणारी स्टेट बँक ऑफ इंडियाचा एका अधिकारी कोरोना संक्रमित आढळून आला आहे. रोज हजारो खातेदार स्टेट बँकेत कामानिमित्त येत असतात, अशा सर्व खातेदार व कर्मचाऱ्यांत यामुळे खळबळ उडाली आहे. खबरदारीचा उपाय म्हणून स्टेट बँकेची मुख्य शाखा बंद करण्यात आली आहे. शहरातील सर्वात जुनी व नावाजलेली भाग्यलक्ष्मी पतसंस्थेतीलदेखील अधिकारी कोरोना संक्रमित आढळल्याने या पतसंस्थेचे कामकाज ठप्प झाले आहे.

# नागरिकांनी सण, उत्सव ‘कोरोना’चे भान ठेवून साजरे करावेत; जिल्हाधिकारी



**मालेगाव,दि.१८(प्रतिनिधी):**‘‘मालेगाव पॅटर्न’चे नाव देशपातळीवर गेले असून त्यास आपण खरेच कौतुकास पात्र आहोत. परंतु, अद्यापही या संसर्गाचा धोका पूर्णपणे टळलेला नाही. त्यामुळे प्रत्येकाने कोरोनाचे भान ठेवूनच सण साजरे करावे,’’ असे आवाहन जिल्हाधिकारी सुरज मांढरे यांनी आज केले. गणेशोत्सवाच्या पार्श्वभूमीवर शहरातील बालाजी लॉन्स येथे आयोजित करण्यात आलेल्या बैठकीत ते बोलत होते. यावेळी जिल्हा पोलीस अधीक्षक ग्रामीण डॉ. आरती सिंग, अप्पर जिल्हाधिकारी धनंजय निकम, अप्पर पोलीस अधीक्षक संदीप घुगे, उपविभागीय अधिकारी विजयानंद शर्मा, महानगरपालिकेचे आयुक्त दीपक कासार, उपायुक्त नितीन कापडणीस, उपविभागीय पोलीस अधिकारी मंगेश चव्हाण, रत्नाकर नवले, तहसीलदार चंद्रजित राजपूत, गट विकास अधिकारी जितेंद्र देवरे, आरोग्य अधिकारी डॉ. सपना ठाकरे, डॉ. हितेश महाले, डॉ. गोविंद चौधरी यांच्यासह गणेश मंडळाचे पदाधिकारी व कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते.

महानगरपालिकेमार्फत प्रत्येक प्रभागनिहाय गणपती विसर्जनाची सुविधा उपलब्ध करून दिली जाणार आहे. सार्वजनिक मंडळांनी शासन आदेशानुसार मंडपाचा आकार व मूर्तीची उंची याची अंमलबजावणी करावी. गणपती विसर्जनासाठी मिरवणुकीला प्रतिबंध घालण्यात आला असून त्याचे काटेकोर पालन होणे अपेक्षित आहे. प्रतिबंधित क्षेत्रात कुठल्याही सार्वजनिक उत्सवास बंदी कायम असून प्रत्येकांनी घरात राहून सण उत्सव साजरे करावेत. महानगरपालिकेचे आयुक्त दीपक कासार म्हणाले, ‘‘या सण–उत्सवाच्या काळात शहरातील सर्व रस्ते खड्डेमुक्त करून नागरिकांना चांगल्या सुविधा देण्यासाठी आवश्यक त्या उपाययोजना करण्यात येतील.’’ यावेळी गणेश मंडळाच्यावतीने मनोगत व्यक्त करताना प्रमोद शुक्ला, दीपक सावळे यांनी शासनाच्या निर्देशांचे काटेकोर पालन करण्याचे आश्वासन दिले.

> नागरिकांना चांगल्या सोयी–सुविधा उपलब्ध करून नागरिकांना त्रास होणार नाही यासाठी प्रशासनामार्फत खबरदारी घेण्यात येणार आहे. कोरोनाचे संकट अजून टळलेले नाही. प्रत्येक नागरिकांनी घरात राहून घरातच सण–उत्सव साजरे करावेत. सांस्कृतिक कार्यक्रमांऐवजी आरोग्यविषयक उपक्रम, शिबिरे आयोजित करण्यास प्राधान्य देण्यात यावे. जातीय सलोखा टिकविण्याची प्रत्येकाची जबाबदारी असून कायदा व सुव्यवस्था अबाधित राहण्यासाठी पोलीस प्रशासन सज्ज आहे. शासन आदेशानुसार मिरवणुकीवर पूर्णपणे बंदी असून सर्व नागरिकांनी प्रशासनास सहकार्य करावे.
>
> **– डॉ.आरती सिंग**,जिल्हा पोलीस अधिक्षक

### मोहरमच्या पार्श्वभूमीवर ताजिया ताबूत समिती सदस्यांशी साधला संवाद

कोरोनासारख्या महामारीचे संकट शहरावर घोंगावत असल्यामुळे मोहरमच्या ताजिया ताबूतच्या मिरवणुकीवर यंदा बंदी घालण्यात आली आहे. त्यामुळे सर्व मुस्लीम बांधवांनी सामाजिक सलोखा राखत घरीच उत्सव साजरा करावा. कोरोनाच्या अनुषंगाने प्रशासनाच्यावतीने दिलेले निर्देश हे सर्वांसाठी सारखेच व सर्वांच्या हिताचेच असल्याने सर्व नागरिकांनी सहकार्य करण्याचे आवाहनही त्यांनी यावेळी केले.

# आरोग्य विज्ञान विद्यापीठाच्या पदव्युत्तर अभ्यासक्रमाच्या परीक्षेस प्रारंभ

**नाशिक,दि.१८(प्रतिनिधी):** महाराष्ट्र आरोग्य विज्ञान विद्यापीठाच्या उन्हाळी सत्राच्या पदव्युत्तर अभ्यासक्रमाच्या परीक्षेस मंगळवारी प्रारंभ झाला आहे. विद्यापीठाच्या पदव्युत्तर वैद्यकीय विद्याशाखा वगळता पदव्युत्तर दंत, आयुर्वेदिक, युनानी, समचिकित्सा, नर्सिंग, भौतिकोपचार, व्यवसायोपचार, भाषा श्रवणदोष विज्ञान आदी विषयांच्या लेखी परीक्षा घेण्यात येत आहेत.

याबाबत माहिती देताना विद्यापीठाचे परीक्षा नियंत्रक डॉ. अजित पाठक यांनी सांगितले की, पदव्युत्तर अभ्यासक्रमाच्या परीक्षेस विद्यार्थ्यांची उपस्थिती ९५ टक्के इतकी होती. राज्यातील ११५ परीक्षा केंद्रांत परीक्षा घेण्यात येत आहेत. परीक्षा केंद्रावर सोडियम हायपोक्लोराईड सोल्युशन व लिक्विड सॅनिटायझरचा वापर करण्यात आला. विद्यापीठाकडून सदरील परीक्षेची सीसीटीव्ही यंत्रणेद्वारे निरीक्षण करण्यात येत असल्याचे त्यांनी सांगितले. सदर परीक्षेसाठी सुमारे सात हजार विद्यार्थ्यांनी परीक्षा अर्ज सादर केले आहेत. परीक्षा दि.२३ ऑगस्ट पर्यंत घेण्यात येणार आहेत. लेखी परीक्षा झाल्यावर प्रात्यक्षिक परीक्षा घेण्यात येतील. नियोजित वेळापत्रकानुसार दि. २५ ते ३१ ऑगस्ट कालावधीत पदव्युत्तर वैद्यकीय विद्याशाखांच्या विद्यार्थ्यांची लेखी परीक्षा आयोजित केलेली आहे. या परीक्षेसाठी २२५० पेक्षा अधिक विद्यार्थी परीक्षा देणार आहेत.

परीक्षेविषयीचे कामकाज यशस्वी करण्यासाठी कुलगुरु यांचे मार्गदर्शन तसेच विद्यापीठाचे साहाय्यक कुलसचिव महेंद्र कोठावदे, प्रमोद पाटील, संतोष कोकाटे, सचिन धेंडे, दीपक सांगळे, किशोर जोपळे यांनी परिश्रम घेतले आहेत.

## एक्सप्रेस’ सुरू करण्याची मागणी

**नाशिक :** कोरोना संकट काळात सुरक्षेच्या कारणास्तव लागू करण्यात आलेल्या ‘लॉकडाऊन’मुळे प्रवासी वाहतूक व्यवस्था बंद करण्यात आली आहे. यात नाशिककरांचा महत्त्वाचा घटक असलेली मनमाड – मुंबई (पंचवटी सुपरफास्ट) एक्सप्रेसदेखील बंद करण्यात आली. मात्र, अत्यावश्यक सेवेतील चाकरमान्यांना दररोज मुंबईत जावे लागत असल्याने त्यांच्या सोयीसाठी ‘पंचवटी एक्सप्रेस’ पुन्हा सुरु करण्यात यावी, अशी आग्रही मागणी खासदार हेमंत गोडसे यांनी आज मध्य रेल्वे विभागाचे डिव्हिजनल प्रबंधक शैलभ गोयल यांच्याकडे निवेदनातून केली. खा. गोडसे यांची मागणी न्यायिक असून ‘पंचवटी सुपरफास्ट एक्सप्रेस’ लवकरच सुरु करण्यासंदर्भात वरिष्ठांशी चर्चा करुन निर्णय घेण्यात येईल, अशी ग्वाही याप्रसंगी रेल्वेचे महाप्रबंधक दिनेश वशिष्ठ यांनी दिली.

हजारो कर्मचाऱ्यांना दररोज नोकरीनिमित्त मुंबई, ठाणे, कल्याण, नवी मुबंई आदी शहराकडे येण्या–जाण्यासाठी सोय नसल्यामुळे अनेक अडचणींचा सामना करावा लागत आहे. अनेकांना आर्थिक भुर्दंड सहन करीत मुंबई गाठावी लागत होती. यामुळे पैसे व वेळेचादेखील अपव्यव होत होता. त्यामुळे अत्यावश्यक सेवेतील कर्मचाऱ्यांना अप–डाऊन करणाऱ्यांसाठी महत्त्वाचा घटक असलेली ‘पंचवटी एक्सप्रेस’ पुन्हा सुरु करावी, अशी मागणी करण्यात आली.

## ज्वेलर्सवर दरोड्याचा प्रयत्न

**नाशिक :** नाशिक रोड येथील सराफ बाजारात असलेल्या वडगावकर ज्वेलर्स या सराफी दुकानावर मध्यरात्री दरोडा टाकण्याचा प्रयत्न झाला. परंतु,अगोदरच सुरक्षा उपाययोजना केल्याने दरोड्याचा प्रयत्न अयशस्वी ठरला.दरम्यान तीन दिवसांपूर्वीच जेलरोड येथील तेजस्वी ज्वेलर्स येथे दरोडा टाकण्याचा प्रयत्न झाला होता. ही घटना ताजी असतानाच आता पुन्हा दुसरी घटना घडल्याने नागरिकांमध्ये भीतीचे वातावरण पसरले आहे. काही वर्षांपूर्वी नाशिक शहरामध्ये दुचाकी जाळण्याचे प्रकार घडले होते, भर गर्दीत धारदार शस्त्राने हल्ला करण्याची प्रकरणही वाढली होती. आता त्या प्रकरणाला आळा बसला असताना, हे प्रकरण घडले. त्यामुळे पोलिसांनी रात्रीची गस्त वाढवावी, अशी मागणी नागरिकांकडून केली जात आहे.


## विनाईल केमिकल्स (इंडिया) लिमिटेड

**सीआयएन:** एल२४१००एमएच१९८६पीएलसी०३९८३७
**नोंदणीकृत कार्यालय:** रिजन्ट चेंबर्स, ७ वा मजला, जमनालाल बजाज मार्ग, २०८, नरिमन पॉईंट, मुंबई - ४०० ०२१. **दूरध्वनी:** २२८२ २७०८; **फॅक्स:** २२०४ ३९६९
**ई-मेल:** cs.vinylchemicals@pidilite.com **वेबसाइट:** www.vinylchemicals.com

**३४वी वार्षिक सर्वसाधारण सभेची सूचना**

ह्याद्वारे सूचना दिली जात आहे की कंपनी कायदा २०१३ (‘कायदा’) मधील तरतुदी व त्या अंतर्गत नियम आणि सेबी (लिस्टिंग ऑब्लिगेशन्स अँड डिस्क्लोजर रिक्वायरमेंट्स) नियम २०१५ (‘लिस्टिंग नियम’) हे कॉर्पोरेट अफेअर्स मंत्रालयाने जारी केलेल्या संबंधित परिपत्रकांसोबत (एमसीए परिपत्रक) आणि सिक्युरिटीज अँड एक्सचेंज बोर्ड ऑफ इंडिया (‘सेबी परिपत्रके’) ह्यांनी जारी केलेल्या परिपत्रकासोबत वाचले असता, त्या अन्वये **विनाईल केमिकल्स (इंडिया) लिमिटेड**च्या (‘कंपनी’) सदस्यांची ३४वी वार्षिक सर्वसाधारण सभा कोविड-१९ च्या जागतिक प्रादूर्भावामुळे सामाईक जागेवर सदस्यांच्या शारीरिक उपस्थितीविना, सदर एजीएम कळवणाऱ्या सूचनेत सांगितल्यानुसार कामकाज पार पाडण्यासाठी (‘एजीएम’) **बुधवार, १६ सप्टेंबर २०२० रोजी सकाळी ११.०० वाजता व्हिडिओ कॉन्फरंसिंग (‘व्हीसी’)/इतर ऑडिओ विजूअल माध्यमांमधून (‘ओएव्हीएम’)** संपन्न होणार आहे.

एजीएम कळवणारी सूचना आणि आर्थिक वर्ष २०१९-२० साठी कंपनीचा वार्षिक अहवाल आणि ३४व्या एजीएममध्ये व्हीसी/ओएव्हीएममधून सहभागी होण्यासाठी लॉगिनचा तपशील इलेक्ट्रॉनिक माध्यमांद्वारे (ई-मेल) अशा सदस्यांना पाठवला जाईल ज्यांनी वरील एमसीए परिपत्रके आणि सेबी परिपत्रकांसाठी कंपनी/डिपॉझिटरी सहभागींकडे (डीपी) ई-मेल पत्ता नोंदवला आहे. कंपनीने एजीएम सूचना आणि वार्षिक अहवाल आपल्या www.vinylchemicals.com वेबसाइटवर, एनएसडीएलच्या www.evoting.nsdl.com आणि बीएससी लिमिटेड आणि नॅशनल स्टॉक एक्सचेंज ऑफ इंडिया अनुक्रमे www.bseindia.com आणि www.nseindia.com वेबसाइटवर उपलब्ध केला आहे.

एजीएमच्या सूचनेत एजीएममध्ये सहभागी होण्याचं मार्गदर्शन केलं आहे. व्हीसी/ओएव्हीएमद्वारे एजीएममध्ये सहभागी होणाऱ्यांची उपस्थिती कायद्याच्या कलम १०३ अंतर्गत गणसंख्या मोजण्यासाठी उपयोगात आणली जाईल.

कायद्याचे कलम ९१ हे कंपनीज (मॅनेजमेंट अँड ॲडमिनिस्ट्रेशन) कायदा २०१४ चा नियम १० आणि लिस्टिंग रेग्यूलेशन्समधील नियम ४२ सोबत वाचले असता त्या अन्वये अशीही सूचना दिली जात आहे की सदस्यांची नोंदवही आणि कंपनीची भाग हस्तांतरण पुस्तिका **बुधवार, २ सप्टेंबर २०२० ते बुधवार, १६ सप्टेंबर २०२०** (दोन्ही दिवसांचा समावेश) लाभांश आणि एजीएमच्या हेतूसाठी बंद राहील.

कंपनी आपल्या सर्व सदस्यांना एजीएम आधी (दूरस्थ ई-मतदान) आणि एजीएम दरम्यान (ई-मतदान) इलेक्ट्रॉनिक मतदान यंत्रणेद्वारे एजीएममध्ये मंजूर होणाऱ्या प्रस्तावित ठरावांवार मतदान करण्याचा अधिकार देत आहे. दूरस्थ ई-मतदान/ ई-मतदान सेवा पुरवण्यासाठी कंपनीने नॅशनल सिक्युरिटीज डीपॉझिटरी लिमिटेड (एनएसडीएल) सोबत आयोजन केले आहे. जर तुमचा ईमेल पत्ता कंपनी/डीपीकडे आधीच नोंदवला असेल तर ई-मतदानासाठी लॉगिन तपशील तुमच्या नोंदणीकृत ईमेल पत्त्यावर पाठवला जाईल. दूरस्थ ई-मतदान **शनिवार, १२ सप्टेंबर २०२० रोजी सकाळी ९.०० वाजता** (भारतीय प्रमाणवेळ) सुरू होईल आणि **मंगळवार, १५ सप्टेंबर २०२० रोजी सायंकाळी ५.०० वाजता** (भारतीय प्रमाणवेळ) समाप्त होईल. दूरस्थ ई-मतदान सुविधा मंगळवार, १५ सप्टेंबर २०२० रोजी सायंकाळी ५.०० नंतर खंडित करण्यात येईल.

दूरस्थ ई-मतदान/ ई-मतदानाद्वारे मतदानाचा अधिकार सदस्याने (एका/अनेक) **बुधवार, ९ सप्टेंबर २०२० (समाप्ती दिनांक)** रोजी धारण केलेल्या समभागांच्या संख्येनुसार असेल. जर सदस्यांकडे समाप्ती तारखेला समभाग असतील तर ते इलेक्ट्रॉनिक पध्दतीने मतदानासाठी पात्र ठरतील. वार्षिक अहवाल इलेक्ट्रॉनिक पध्दतीने पाठवल्यानंतर आणि ९ सप्टेंबर २०२० ह्या समाप्ती तारखेला सदस्याकडे समभाग असतील तर त्याला लॉगिन आयडी आणि पासवर्ड प्राप्त होईल, त्यासाठी त्याने evoting@nsdl.co.in वर विनंती पाठवावी. ज्या सदस्यांनी दूरस्थ ई-मतदानाद्वारे मत दिलं असेल त्यांना एजीएममध्ये सहभागी होता येईल, पण एजीएममध्ये पुन्हा ई-मतदानाद्वारे मत देता येणार नाही. दूरस्थ ई-मतदान/ई मतदानाची तपशीलवार प्रक्रिया एजीएम सूचनेमध्ये आणि एनएसडीएलने सदस्यांना पाठवलेल्या ईमेलमध्ये उपलब्ध आहे.

ई-मतदानासंबंधी कोणतीही शंका/ तक्रार असेल तर तुम्ही www.evoting.nsdl.com वर डाउनलोड विभागात उपलब्ध असलेले वारंवार विचारले जाणारे प्रश्न (एफएक्यूज) पाहू शकता किंवा श्री अमित विशाल, एनएसडीएल, ४ था मजला, ए-विंग, ट्रेड वर्ल्ड, कमला मिल्स कंपाउंड, सेनापती बापट मार्ग, लोअर परळ, मुंबई ४०००१३ ह्यांना संपर्क करा, ईमेल evoting@nsdl.co.in किंवा amitv@nsdl.co.in, फोन:२४९९ ४२०० अथवा टोल फ्री नंबर: १८०० २२२ ९९०.

जर तुम्ही तुमचा ई-मेल पत्ता नोंदविला नसेल आणि / किंवा तुमचा बँक तपशील कंपनी / डीपीकडे अद्ययावत केला नसेल तर तुम्ही व्हीसी / ओएव्हीएम मार्फत एजीएममध्ये सामील होण्यासाठी ई-मतदानासाठी लॉगिन तपशील मिळविण्यासाठी खाली दिलेल्या सूचनांचे अनुसरण करू शकता.

**भौतिक भागधारणा:**

कंपनीच्या आर अँड टी प्रतिनिधीला स्वाक्षरी केलेलं पत्र पाठवून त्यात फोलिओ क्रमांक, भागधारकांची नाव आणि पॅनची प्रत (स्वयं प्रमाणित केलेली) आणि ईमेल पत्ते नोंदवण्यासाठी ईमेल पत्त्यांचा तपशील पाठवा.

बँक खात्याचा मँडेट अद्ययावत करण्याकरिता, त्यांच्या बँक खात्यामध्ये लाभांश थेट प्राप्त करण्यासाठी, खालील कागदपत्रांची प्रत आर अँड टी प्रतिनिधींना पाठवा :

अ. स्वाक्षरी केलेलं पत्र पाठवा ज्यात तुमचं नाव, फोलिओ क्रमांक, संपूर्ण पत्ता आणि जिथे लाभांश प्राप्त करायचा आहे त्या बँक खात्यासंबंधी पुढील तपशील असावा: i) बँकेचं नाव आणि शाखा व बँक खात्याचा प्रकार; ii) कोर बँकिंग सोल्यूशन्सची अंमलबजावणी झाल्यानंतर तुमच्या बँकेने दिलेला बँक खाते क्रमांक आणि; iii) ११ अंकी आयएफएससी कोड.

ब. जर भाग संलग्न स्वरूपात धारण केले असतील तर सदस्याचं किंवा प्रथम धारकाचं नाव असलेला, कँसल केलेला चेक;

क. पॅन कार्डाची स्वयं प्रमाणित केलेली प्रत आणि;

ड. कंपनी/आर अँड टी प्रतिनिधीकडे नोंदवल्यानुसार सदस्याच्या पत्त्याची पडताळणी करण्यासाठी कोणत्याही कागदपत्राची स्वयं प्रमाणित केलेली प्रत (उदाहरणार्थ: आधार कार्ड, ड्रायव्हिंग लायसन्स, मतदाता ओळखपत्र, पासपोर्ट)

**डीमॅट स्वरूपात भागधारणा:**

कृपया तुमच्या डिपॉझिटरी सहभागींना संपर्क करा आणि तुमच्या डीपीने सूचविलेल्या प्रक्रियेनुसार, डीमॅट खात्यात ई-मेल पत्ता व बँक खात्याचा तपशील नोंदवा.

**विनाईल केमिकल्स (इंडिया) लिमिटेडकरिता**
**पी.सी. पटेल**
**अध्यक्ष आणि सचिव**

**१९ ऑगस्ट, २०२०**
**मुंबई**


# लासलगावच्या सुपुत्राकडून फार्मसी अभ्यासाठी विशेष ॲप विकसित

**लासलगाव :** भारत आणि चीनमध्ये सध्या तणावाची परिस्थिती निर्माण झाली आहे कोट्यवधींच्या व्यापारासह विविध चिनी ॲपवर बहिष्कार टाकून ‘आत्मनिर्भर भारता’चा नारा देशाचे पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी दिला आहे. या मिशनमध्ये सहभागी होत निफाड तालुक्यातील लासलगावचे भूमिपुत्र असलेल्या तसेच नाशिकच्या एकलहरा येथील मातोश्री कॉलेज ऑफ फार्मसी या कॉलेजचा शेवटच्या वर्षातील विद्यार्थी प्रतीक उमेश पारीक याने ‘फार्मा विसडोम हब लाईट’ या नावाने ॲप ७४ व्या स्वातंत्र्य दिनाच्या पार्श्वभूमीवर १५ ऑगस्ट रोजी कार्यान्वित केले आहे.



बहुउपयोगी सुविधा असलेल्या ‘फार्मा विसडोम हब लाईट’ हे ॲप फार्मसीच्या विद्यार्थ्यांसह शिक्षकांनाही उपयोगी ठरणारे आहे.

या ॲपमुळे डी.फार्मसी, बी.फार्मसीचे सर्व विषयांची रेफरन्स पुस्तके, एम. फार्मसीच्या पहिल्या वर्षीची रेफरन्स पुस्तके, फार्मसी स्पर्धा परीक्षेच्या नोट्स व सराव प्रश्नपत्रिका, विद्यार्थी मार्गदर्शन मंच, साप्ताहिक सराव परीक्षा, अभ्यासक्रमानुसार व्हिडिओ लेक्चर, फार्मा ब्लॉग या सर्व सुविधा मोफत उपलब्ध असणार. कोरोनामुळे देशात ‘लॉकडाऊन’ आणि ‘अनलॉक’ यामुळे गेल्या सहा महिन्यांपासून शाळा महाविद्यालये बंद असल्याने विद्यार्थ्यांची पुढील शिक्षणाची गैरसोय होत असल्याने रेफरन्स पुस्तक,मेडिकल क्षेत्रातील सर्व आवश्यक असलेल्या परिपूर्ण बाबींसह ‘फार्मा विसडोम हब लाईट’ या नावाने (https://play.google.com/store/apps/details?id=pharma.wisdom.hub) ॲप मोफत विद्यार्थासाठी उपलब्ध करून दिले आहे कोरोनाचा प्रादुर्भाव होऊ नये म्हणून विद्यार्थ्यांना कॉलेजमधून ऑनलाईन शिक्षण दिले जात आहे. या अभ्यासक्रमादरम्यान येणाऱ्या अडचणी बहुउपयोगी सुविधा असलेल्या ‘फार्मा विसडोम हब लाईट’ या ॲपमुळे दूर होणार असल्याचे मत प्राचार्य डॉ गोकुळ तळेले यांनी व्यक्त केले आहे.

## केबीटी अभियांत्रिकी महाविद्यालयात ‘हिट ट्रान्सफर’ विषयावरील ऑनलाईन कार्यशाळा संपन्न

**नाशिक :** केबीटी अभियांत्रिकी महाविद्यालय यांत्रिकी विभागाच्यावतीने दोन दिवसीय कार्यशाळा ऑनलाईन पद्धतीने आयोजित करण्यात आली होती. कार्यशाळेच्या उद्घाटनप्रसंगी संस्थेचे शिक्षणाधिकारी व प्राचार्य डॉ. नानासाहेब पाटील यांनी दैनंदिन जीवनात व औद्योगिक वापरात ‘हीट ट्रान्सफर’ या विषयाचे महत्त्व विशद करून संशोधनाला उपलब्ध असलेल्या संधीवर काम करण्याचे आवाहन उपस्थित शिक्षक व विद्यार्थी यांना केले. कार्यक्रमाप्रसंगी प्रमुख पाहुणे म्हणून नाशिकचे चीफ मॅनेजर डॉ परेश गुप्ता उपस्थित होते. डॉ. गुप्ता यांनी अवकाश संशोधन क्षेत्रात व विमाननिर्मिती कामात ‘हीट ट्रान्सफर’ या विषयासंबंधी लागणाऱ्या मूलभूत संकल्पनांची माहिती उपस्थितांना करून देत अभियांत्रिकी महाविद्यालये व इंडस्ट्री यांनी एकत्रितपणे विविध संशोधन प्रकल्पांवर काम करण्याची अपेक्षा व्यक्त केली. या प्रसंगी महाविद्यालयाचे उपप्राचार्य प्रा. एन. बी. देसले उपस्थित होते. यांत्रिकी विभागप्रमुख डॉ. व्ही. सी. शेवाळे यांनी उपस्थित मान्यवरांचे स्वागत केले.


## पश्चिम रेल्वेच्या वांद्रे टर्मिनस - जम्मु तावी, ओखा-न्यू गुवाहाटी आणि पोरबंदर-शालिमार दरम्यान पार्सल विशेष ट्रेन्सच्या वेळेत बदल

**बदललेले वेळापत्रक ऑगस्ट १८, २०२० पासून लागू झाले आहे. पार्सल विशेष ट्रेन्स धावण्याचे दिनांक आणि दिवस तेच राहतील.**

| ट्रेन क्र. ००९०१ (वांद्रे टर्मिनस-जम्मु तावी) | | | ट्रेन क्र. ००९०२ (जम्मु तावी-वांद्रे टर्मिनस) |
|---|---|---|---|
| आगमन | प्रस्थान | स्थानके | |
| १९.३० (प्रस्थान) | | वांद्रे टर्मिनस | अप दिशेच्या वेळेत कोणताही बदल नाही. |
| २०.५० | २१.०० | पालघर | |
| २२.१० | २२.२५ | वापी | |
| २२.४५ | २२.५० | वलसाड | |
| २३.३५ | २३.५० | सुरत | |
| ००.२५ | ००.३० | अंकलेश्वर | |
| ००.४० | ००.४५ | भरूच | |
| ०१.४५ | ०२.०० | वडोदरा | |
| ०२.४५ | ०३.०० | आनंद | |
| ०४.०० | ०४.४० | अहमदाबाद | |
| ०५.५० | ०६.०० | महेसाणा | |

| ट्रेन क्र. ००९४९ (ओखा-न्यू गुवाहाटी) | | | ट्रेन क्र. ००९५० (न्यू गुवाहाटी-ओखा) |
|---|---|---|---|
| आगमन | प्रस्थान | स्थानके | |
| ०५.१५ (प्रस्थान) | | ओखा | अप दिशेच्या वेळेत कोणताही बदल नाही. |
| ०७.४५ | ०७.५५ | जामनगर | |
| ०९.२० | ०९.४० | राजकोट | |
| ११.४० | ११.५० | सुरेंद्र नगर | |
| १३.५० | १४.३० | अहमदाबाद | |
| १५.३५ | १५.५५ | आनंद | |
| १६.४० | १७.१० | छायापुरी | |
| २१.२० | २१.४० | रतलाम | |

या ट्रेन मार्गांवरील इतर सर्व स्थानकांकरिता आगमन आणि प्रस्थानाच्या वेळांमध्ये कोणताही बदल नाही

| ट्रेन क्र. ००९१३ (पोरबंदर - शालिमार) | | | ट्रेन क्र. ००९१४ (शालिमार-पोरबंदर) |
|---|---|---|---|
| आगमन | प्रस्थान | स्थानके | |
| ०६.०० (प्रस्थान) | | पोरबंदर | अप दिशेच्या वेळेत कोणताही बदल नाही. |
| ०८.२० | ०८.३० | जामनगर | |
| १०.०० | १०.२० | राजकोट | |
| १२.३० | १२.४० | सुरेंद्र नगर | |
| १४.३५ | १५.१५ | अहमदाबाद | |
| १६.२० | १६.५० | आनंद | |
| १७.३५ | १७.५५ | वडोदरा | |
| १९.०० | १९.१० | भरूच | |
| १९.२० | १९.३० | अंकलेश्वर | |
| २०.३० | २०.५० | सुरत | |
| २२.५० | २३.०० | नंदूरबार | |

या ट्रेन मार्गावरील इतर सर्व स्थानकांकरिता आगमन आणि प्रस्थानाच्या वेळांमध्ये कोणताही बदल नाही

ओखा आणि गुवाहाटी दरम्यान धावणाऱ्या ट्रेन क्र. ००९४९ / ००९५० चा दि. १६.०८.2020 पासून न्यू गुवाहाटी (एनजीसी) पर्यंत विस्तार करण्यात आला आहे.
त्यांच्या धावण्याच्या संबंधित दिवशी न्यू गुवाहाटी येथे आगमन २०.०० वाजता न्यू गुवाहाटी येथून प्रस्थान २०.०० वाजता

पश्चिम रेल्वेवर पार्सलचे आरक्षण करण्याकरिता कोणतीही सहाय्यता हवी असल्यास कृपया २४ × ७ हेल्पलाईन मोबाईल क्र.: +९१ ९००४४९०९८२ ईमेलः cmicccg@gmail.com वर संपर्क साधावा.

**WESTERN RAILWAY**
www.wr.indianrailways.gov.in
आम्हाला लाईक करा : facebook.com/WesternRly | आम्हाला फॉलो करा : twitter.com/WesternRly